महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६९ दिनांक १७ / ०३ / २०१८

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दिनांक २८.०२.२०१८.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६४ दिनांक ०५.१०.२०१७.

........

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून सुधारीत वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर १३६% वरून १३९% केला आहे. तसेच सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारीत दर दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ पासून लागू करण्यात आला असून दिनांक ०१ जुलै, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश पारित करण्यात येणार आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्त्याचा दर १३६% ऐवजी १३९% असा दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून सुधारीत करण्याकरिता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारीत महागाई भत्त्याचा दर दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ पासून लागू करण्यात यावा व माहे फेब्रुवारी-२०१८ या महिन्यातील महागाई भत्त्यापोटीच्या फरकाची रक्कम माहे मार्च-२०१८ च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. उपरोक्त सुधारित दराने द्यावयाच्या दिनांक ०१ जुलै, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासंकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

C:\Users\ADMIN\Downloads\ON D.A.& Draft 28 Feb.2018(1).doc